गुरुवार दि.०९ मे २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २५२
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# बुध्दाशिवाय पर्याय नाही-डॉ.संघर्ष सावळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । ज्ञानेश्वर बुधवत**

साहित्यधारा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था छ. संभाजीनगर - औरंगाबाद च्या वतीने स्थानिक एम. जी. एम. विद्यापीठाच्या अत्यंत रमणीय परिसरातील आईनस्टाईन अद्यावत सभागृहात बुध्द जयंती -२०२४ निमित्ताने दि.०५-०५-२०२४ रोजी आयोजित ' चलो बुध्दकी ओर ' या पुरस्कार वितरण तथा कवी संमेलन अशा द्विसत्रीय कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राच्या प्रास्ताविक भाषणातून, संस्थेचे अध्यक्ष व स्कॉटलंड यार्ड स्टुडंट्स ब्रँड ॅबेसेडर तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर - औरंगाबाद मधे अर्थशास्त्र विभागाचे ज्येष्ठ प्राध्यापक असलेले डॉ. संघर्ष सावळे यांनी वैचारिक भूमिका मांडताना वरीलप्रमाणे उदगार काढले. तर या आगळ्यावेगळ्या सोहळ्याच्या उदघाटक तथा छ. संभाजीनगर च्या समाज कल्याण उपायुक्त मा. जयश्री सोनकवडे यांनी, बुध्द समजून घेणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन करून कार्यक्रमाचे उदघाटन झाल्याचे घोषित केले. तथा प्रमुख अतिथी या नात्याने माजी जिल्हा व सत्र न्यायाधीश व सध्या औरंगाबाद विभागाचे पोलीस तक्रार निवारण प्राधिकरणाचे अध्यक्ष मा. डी. जे. शेगोकार यांनी, बुध्दाचा विज्ञानवादी विचार हाच मानवी कल्याणकारी मार्ग ठरेल, असे विधान केले. तर बुध्दाची तत्वप्रणाली हे अंतिम सत्य म्हणून मान्य करणे कसे आवश्यक आहे यावर प्रा. एस. पी. हिवाळे यांनीही आपले विस्तृत विचार प्रतिपादन केले. तसेच या भव्यदिव्य समारंभासाठी अध्यक्ष म्हणून लाभलेले सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय, छ. संभाजीनगर चे संगीत विभाग प्रमुख मा.प्रा. डॉ.संजय मोहड यांनी सुध्दा, संपूर्ण विश्वातील प्राणीमात्रांना आश्वस्त करणारा भ. बुध्दाचा अहिंसा तथा शांतीचा संदेश मानवी जीवनाचे मर्म असल्याचे मत प्रदर्शित केले.

या अविस्मरणीय संमेलनाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून भ. बुध्दाच्या प्रतिमेची धूप पुष्प पूजा तथा पूज्य भन्ते डॉ. चंद्रबोधी यांच्या पावन





त्रिसरण पंचशील प्रबोधनाने करण्यात आली. तर

मान्यवर विद्वत्जनांच्या हस्ते महाराष्ट्राच्या बहुतांश जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक, धम्म प्रबोधन अशा विविध क्षेत्रातील सेवाभावी कार्यास वाहून घेतलेल्या मान्यवरांना पुढील प्रमाणे सन्मानजनक पुरस्काराने गौरविण्यात आले ---

१- डॉ. मिलिंद दहिवले, नागपूर
( अध्यक्ष, केंद्रीय मानवाधिकार संगठन नई दिल्ली ) - शांतिदूत,
२- मा. मंगला शिरवाडकर, मुंबई - महिला सक्षमीकरण,
३- मा. शकीला पठाण,
छ. संभाजीनगर - आदर्श समाजसेविका,
४- मा. शीतल शेगोकार,
शेगाव - फुले-शाहू-आंबेडकर,
५- डॉ. संकेत एकनाथ पाडळे,
छ. संभाजीनगर - आदर्श प्रशासकीय अधिकारी,
६- मा. सुरेखा कळसाईत,
पुणे - महिला सक्षमीकरण,
७- फरिदा शफीक खान,
धुळे - आदर्श शिक्षिका,
८- डॉ. विनोद नरवडे, छ. संभाजीनगर - आदर्श शिक्षक,
९- डॉ. दिलीप घोंगडे,
धुळे - फुले-शाहू-आंबेडकर,
१०- मा. राहुल पवार,
चिखली - युवा रत्न,
११- मा. अरूण भिसे,
चिखली - युवा रत्न,
१२- मा. सचिन साळवे,
चिखली - युवा रत्न,
१३- मा. रामदास जाधव,
चिखली - युवा रत्न,
१४- मा. सुमेध जाधव,
चिखली - युवा रत्न,
१५- मा. बबिता डोळस,
नागपूर - महिला सक्षमीकरण,
१६- मा. निलिमा बागूल, छ. संभाजीनगर - आदर्श उद्योजिका,
१७- मा. सुनील भोसले,
पुणे - आदर्श पत्रकार,
१८- मा. पंकज सरदेशपांडे,
छ. संभाजीनगर - आदर्श प्र. अधिकारी,
१९- मा. शीतल गिरी, छ. संभाजीनगर - आदर्श शिक्षिका,
२०- मा. सुमन गरूड, बाग पिंपळगाव - महिला सक्षमीकरण,
२१- मा. राजेंद्र जाधव,
भटाणा - आदर्श समाजसेवक,
२२- मा. संदीप पळसपगार,
रेल, अकोट - आदर्श शिक्षक,
२३- मा. शोभा वेले,
नागपूर - आदर्श साहित्य लेखिका,
२४- मा. मंगला मेहेर,
नागपूर - आदर्श उद्योजिका,
२५- प्रा. शिलवंत गोपनारायण,
छ. संभाजीनगर - फुले-शाहू-आंबेडकर,
२६- प्रा. डॉ. यशवंत खडसे,
छ. संभाजीनगर - फुले-शाहू-आंबेडकर,
२७- मा. भाग्यश्री बागड,
बलसाड, गुजरात - साहित्य गौरव,
२८- मा. वैशाली जोशी,
छ. संभाजीनगर - आदर्श उद्योजिका,
२९- मा. विलास कटारे,
मनमाड - आदर्श समाजसेवक,
३०- मा. अमोल भिलंगे,
जस्तगाव, संग्रामपूर - समाजभूषण,
३१- मा. माधुरी मेश्राम,
नागपूर - समाजभूषण,
३२- मा. सुवर्णा रंगारी,
नागपूर - समाजभूषण,
३३- मा. डॉ. विजय घुबडे, अमरावती - समाजभूषण,
३४- मा. संहिता भालेराव,
छ. संभाजीनगर - आदर्श विद्यार्थिनी,
३५- मा. तुकाराम व-हाडे,
सारोळा - समाजभूषण,
३६- मा. वंदना रायबोले,
नागपूर - आदर्श महिला उद्योजिका,
३७- मा. बाळासाहेब देशमुख,
वाशिम - आदर्श पत्रकार,
३८- मा. सविता गोसावी,
अमरावती - समाजभूषण,
३९- मा. अर्पिता सुरक्षा,
पोफळी - आदर्श समाजसेविका,
४०- मा. दीपक खडसे,
अमरावती - आदर्श शिक्षक,

इ. मान्यवरांना वरीलप्रमाणे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे गुजरात बलसाड च्या पुरस्कार प्राप्त तरूण साहित्यिक कवयित्री यांनी त्यांचा लहानगा मुलगा आजारी असल्याने पुरस्कार स्वीकारण्यासाठी येवू शकत नसल्याने, चि. उत्कर्ष संघर्ष सावळे या लहानग्या पण तत्पर कार्यकर्त्याच्या हस्ते सदर पुरस्काराचा, त्यांच्या वतीने स्विकार व्हावा अशी विनंती आयोजकांना, डॉ. विजयकुमार कस्तुरे यांच्या मार्फत करून तो पुरस्कार प्राप्त करून घेतला. त्यामुळे चि. उत्कर्षचे उपस्थित सर्वांनी हार्दिक अभिनंदन केले.

असा हा ऐतिहासिक सोहळा डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, डॉ. डी. व्ही. खरात, चिखली, मा. ज्ञानेश्वर बुधवत, संपादक, दैनिक लोकनेता, सिंदखेडराजा, मा. कुमावत, मा. चिनके, औरंगाबाद, मा. मिलिंद कांबळे, मा. कविता पडळकर, मलकापूर इ. च्या सहकार्यशील उपस्थितीत यशस्वीपणे संपन्न झाला.

### पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आज आष्टीत जाहीर सभा

## मतदार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-मा.आ.भिमरावजी धोंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

भाजप महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ आज आष्टीत दि.९ मे रोजी जाहीर सभा होणार असून आष्टी विधानसभा मतदारसंघातील बहाद्दर मतदार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आष्टी विधानसभा मतदारसंघाचे मा.आ.भिमरावजी धोंडे यांनी केले आहे.पुढे बोलताना मा.आ.धोंडे म्हणाले की लोकसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून भाजपा महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना मतदारांचा व नागरीकांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणावर



मिळत असून त्यांचा विजय निश्चित आहे.त्यांनी केलेल्या विकास कामांच्या जोरावर मोठ्या मताधिक्याने निवडून येणार आहेत.जिल्ह्याच्या विकासासाठी व ऊस तोडणारा नाही तर ऊस पिकवणारा जिल्हा व तरुणांना रोजगार देणारा जिल्हा ओळख निर्माण करून देण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना बहाद्दर मतदार बांधवांनी मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे आज दि.९ मे रोजी आष्टी शहरातील मोरेश्वर मंगल कार्यालय येथे सकाळी ११ वाजता जाहीर सभा होणार असून भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे, रासप नेते महादेवजी जानकर, राजेंद्र म्हस्के, तालुकाध्यक्ष साहेबराव म्हस्के भाजप महायुतीच्या मित्र पक्षातील पदाधिकारी यांची उपस्थिती राहणार आहे.तरी आष्टी विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मा.आ.भिमराव धोंडे यांनी केले आहे.

## श्री संत भगवान बाबा व वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे दि.१० ते१२ मे २०२४ रोजी अखंड त्रिद्विवशीय हरिनाम तपपूर्ती सोहळ्याचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

श्री संत भगवानबाबा व श्री संत वामनभाऊ यांच्या कृपाशीर्वादाने श्री.संत वामनभाऊ, श्री.संत भगवान बाबा, संत तुकाराम, विठ्ठल-रूक्मिणी व हनुमान देवता मुर्ती प्राणप्रतिष्ठेच्या १२ व्या वर्धापन दिन व तपपूर्ती सोहळ्या निमित्त ह.भ.प. विठ्ठल महाराज शास्त्री(श्री. क्षेत्र गहिनीनाथगड)यांच्या आशीर्वादाने सर्व धर्म समभाव व राष्ट्रीय एकात्मता हा उद्देश समोर ठेवून शुक्रवार दिनांक १० ते ११ में दरम्यान श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड बीड येथे अखंड त्रिद्विवशीय हरिनाम सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचा कलक्ष स्थापना व विणापुजन दिनांक १० मे २०२४ रोजी दुपारी २ वाजता होईल या सोहळ्यातील दैनंदिन कार्यक्रमात सकाळी ०५ ते ०६ काकडा,०६ ते ०७ विष्णुसहस्त्र नाम ०७ ते १० पुजा अभिषेक आरती ११ ते ०१ गाथा भजन ०१ ते २ भोजन, ०३ ते ०५ ज्ञानेश्वरी प्रवचन,०५ ते ०६ हरिपाठ, ०८ ते ११ हरि किर्तन व नंतर हरिजागर होईल.दिनांक १० मे २०२४ शुक्रवार रोजी दुपारी ०३ ते ०५, ह.भ.प.प्रा. जनार्दन महाराज शेळके विश्वस्त(श्रीक्षेत्र नारायणगड) व ह.भ.प.रामहरी रसाळ गुरूजी (विभागीय प्रवक्त्ता वा स) यांचे प्रवचन रात्री ०८ ते ११ ह.भ.प.पांडुरंग महाराज गुरु रामदास महाराज(महंत डोंगरेश्वर संस्थान करंजवन),यांचे हरि किर्तन होईल. दिनांक११ मे-२०२४ शनिवार रोजी ०३ ते ०५ ह.भ.प.उमाशंकर शिंदे महाराज(केज)व ह.भ.प. कचरू महाराज चव्हाण (बीड) यांचे प्रवचन तर ०८ ते ११ या वेळेत ह.भ.प.रामकृष्ण महाराज रंधवे बापू (विठ्ठलगड पाटोदा) यांचे हरिकिर्तन होईल दिनांक १२ मे-२०२४ रोजी रविवार सकाळी ११ ते ०१ या वेळेत ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली मंझरीकर यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन होईल नंतर महाप्रसाद होईल.या वेळी गुरुवर्य ह.भ.प.विठ्ठल महाराज (श्रीक्षेत्र गहिनीनाथगड) यांचे शुभ हस्ते मंदिराच्या शिखराचे बांधकामांचे पुजन करण्यात येईल. तदनंतर बीड जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीतील उल्लेखनीय कार्याबद्दल ह.भ. प.भगवान महाराज सार्वजनिक वाचनालय बीड व श्री संत भाऊ बाबा प्रतिष्ठानच्या वतीने स्व. मुरलीधरराव सानप यांच्या स्मरणार्थ जिल्हास्तरावरील २०२४ चा उत्कृष्ट ग्रंथालयाचा (ग्रंथ गौरव पुरस्कार) ज्ञानसागर सार्वजनिक वाचनालय येवलवाडी ता. पाटोदा व उत्कृष्ट ग्रंथालय कर्मचारीसाठी (ग्रंथ साथी पुरस्कार) श्री विठ्ठल ज्ञानोबा जाधव ग्रंथपाल बालेपीर सार्वजनिक वाचनालय बीड यांना हे पुरस्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिनांक १२ मे-२०२४ रोजी प्रदान करण्यात येतील तरी शहर व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा. असे आवाहन श्री संत भाऊ, बाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र सानप यांनी केले.

### रोहित पवारांचे वक्तव्य नैराश्यातून त्यांच्यावर निवडणूक आयोगाने विशेष लक्ष्य ठेवावे-चाकणकर

**पुणे**-आमदार रोहित पवार मागील दीड महिना वेगवेगळी विधाने करताना त्यांच्यात नैराश्य दिसून येते. जनाधार नाकारला गेल्याने आपला विजय होणार नाही हे त्यांच्या लक्षात आल्याने ते विविध टीका करुन जनतेत संभ्रम निर्माण करतात. त्यामुळे निवडणूक आयोगाने आमदार रोहित पवार यांच्यावर विशेष लक्ष्य ठेवावे अशी माझी आयोगास विनंती आहे असे मत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.पुणे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंबर बँक्वेट, वारजे येथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत महायुतीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. यानंतर त्या बोलत होत्या. पुणे लोकसभेचे महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ ही बैठक महत्वपूर्ण होती. पुण्यातील मतदारांशी संवाद साधत जनसंपर्क वाढवत जास्तीत जास्त मतदान करण्यासाठक्ष प्रयत्न करण्याचे आवाहन अजित पवार यांनी केले. त्यासोबत संघटनात्मक बांधणीवर लक्ष केंद्रित करत नरेंद्र मोदी व महायुती सरकारच्या योजना तळागळातील जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी कार्यरत रहाण्याच्या सूचना देखील यावेळी देण्यात आल्या.

### चारोळी

**येतील ती आव्हाने**
**पेलता यायला हवीत**
**फार काही नाही हाती लागले तरी**
**अनुभवाची पाने उलगडत रहावीत**


**रंजना सानप**
**मायणी (सातारा)**

## बिबट्याच्या हल्ल्यात आठ वर्षीय मुलाचा मृत्यु

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जुन्नर । मयूर ढोबळे**

दि .८ काळवाडी येथे घराच्या बाहेर अंगणात खेळत असलेल्या आठ वर्षाच्या मुलावर बिबट्याने हल्ला केला असून या हल्ल्यात हा मुलगा ठार झाला आहे ही घटना बुधवारी (दि ८)सकाळी वाजण्याच्या सुमारास घडली . रुद्र महेंद्र फापाळे(वय - ८वर्षे रा .बेलापूर ता अकोला जि अ.नगर )असे ठार झालेल्या मुलाचे नाव आहे .याबाबत मिळालेली माहीती अशी की काळवाडी (ता.जुन्नर )येथील ग्रामदैवत कालिकामाता यात्रा उत्सव मंगळवार (दि ७)पासून सुरू झाला आहे रुद्र हा त्याच्या मामा सचिन रोहिदास काकडे यांच्याकडे यात्रेसाठी आला होता तो सकाळी साडे आठ वाजता घराच्या ओट्यावर काही मुलांसोबत खेळत असताना अचानक बिबट्याने त्याच्यावर हल्ला केला व त्याला बाजूला असलेल्या उसाच्या शेतात घेऊन गेला या हल्ल्यात या बालकाचा



मृत्य झाला आहे .या घटनेची माहीती मिळाल्यानंतर ओतूर वनपरिक्षेत्र अधिकारी वैभव काकडे यांच्यासह वनखात्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळावर हजर झाले .जुन्नर तालुक्यात बिबट्याकडून वारंवार माणसांवर हल्ले होण्याच्या घटना वाढत आहे अश्या घटना घडून गेल्यानंतर वनखाते जागे होते व त्या परिसरात पिंजरा लावून नागरिकांना तात्पुरता दिलासा देण्याचं काम करते वनखात्याकडून याबाबत कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे .

## खांबेगाव येथे ७०.५५ टक्के मतदान ; बीएलओ मुर्तुजा शेख यांनी घेतले परिश्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लातुर लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या लोहा तालुक्यातील मौजे खांबेगाव येथील मतदान केंद्रावर शांततेत ७०.५५ टक्के मतदान झाले असुन बीएलओ मुर्तुजा शेख यांनी घेतले परिश्रम.

खांबेगाव येथे लातूर लोकसभा निवडणूकीसाठी जि.प. शाळेचे मुख्याध्यापक मुर्तुजा शेख यांची निवडणूक विभागाने नियुक्ती केली होती. तेव्हा खांबेगाव येथील मतदान केंद्रावर जास्तीत जास्त संख्येने मतदान व्हावे म्हणून बीएलओ मुर्तुजा शेख यांनी जनजागृती केली व दि. ७ मे रोजी दिवसभर ते मतदान केंद्रावर बसून होते. यावेळी लातूर लोकसभा मतदारसंघासाठी खांबेगाव येथे ७०.५५ टक्के मतदान झाले आहे. एकुण ५२३ पैकी ३६९ मतदान झाले असुन मतदानाची टक्केवारी ७०.५५इतकी झाली.बीएलओ मुर्तुजा शेख यांनी मतदान जास्तीत जास्त होण्यासाठी परिश्रम घेतले.





**आष्टी येथे बीड लोकसभेचे उमेदवार श्री.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ खासदार अमोल कोल्हे आले असता चर्चा करताना. राष्ट्रीय कॉँग्रेसचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल जाधव, या प्रसंगी उपस्थित प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील(छाया:-लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा.)**

## माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत साई केंब्रीज मराठी उच्च माध्यमिक विद्यालयाचे २० विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी । कौतिक हिवाळे**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये परीक्षा मंडळ पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत साई केंब्रीज मराठी प्राथमिक ते उच्च माध्यमिक विद्यालय शाळेच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. इयत्ता आठवी शिष्यवृत्तीत २० विद्यार्थी पात्र झाले आहे.सर्व पात्र विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष किरण कुमार भूते सचिव कपिल भूते सर मुख्याध्यापक सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मा. जिल्हा परिषद सदस्य शंकर भुते अभिनंदन केले. पात्र विदयार्थी भावेश राहुल कोथलकर,जमीर हनीफ शेख, . सोहम शंकर वाघ, कविता गजानन वाघ, हर्षल किशोर गादिया, पूजा विलास काठोळे, नंदिनी सुनील राजपूत,ऋतुजा एकनाथ हिवाळे, पायल दुर्गा सिंग राजपूत, आरुषी सुभाष पवार, वेदिका संदीप तेलंग्रे ,वैभव नंदकिशोर तायडे, साई समाधान तपकिरे, वेदांत गजानन पवनकर,भूषण गणेश पंडित, धीरज गणेश गवळी, प्रांजल विनोद जाधव,आस्था गणेश पवनकर, ज्ञानेश्वर गवळी,. राजश्री सुनील पायघन.

संपादकीय

# कांद्याचे भटकते भूत



लोकसभा निवडणूक ऐन बहरात असताना केंद्र सरकारने कांद्याची निर्यातबंदी उठविली. शेतकऱ्यांचा रोष तापदायक ठरून त्याचा मतदानावर परिमाण होणार, असे वाटत असल्यानेच हा निर्णय घेतल्याची टीका शेतकरी नेत्यांसह विरोधी पक्षांनी केली. ही निर्यातबंदी साधी सरळ नाही. मायबाप सरकारच्या निर्णयामुळे निर्यातशुल्क व निर्यातमूल्य मिळून एक टन कांदा निर्यातीसाठी ६४ हजार रुपये मोजावे लागणार आहेत; म्हणजे किलोभरासाठी ६४ रुपये. आवळा देऊन कोहळा काढण्याच्या या प्रकाराने आधीच संतापलेला बळीराजा या खेळीने दुखावला.

कांदा दराचा प्रश्न हा भारतीय जनता पक्षाच्या दृष्टीने नेहमीच डोकेदुखी बनला असल्याचे त्यांच्या प्रत्येक निर्णयातून प्रकर्षाने दिसते. कधी काळी दिल्लीतील सरकार कांदाप्रश्नातच गारद झाले होते, तेव्हापासून या भीतीचे भाजपच्या मानगुटीवर बसलेले भूत काही केल्या उतरायला तयार नाही. किंबहुना भाजपही त्या भीतीतून बाहेर पडायला तयार नाही. मागील अडीच महिन्यांत कांद्याच्या प्रश्नात केंद्राने ज्या कोलांटउड्या मारल्या, त्यातील प्रत्येक उडीमागे ही भीती दिसतेच दिसते. गतवर्षी डिसेंबरमध्ये कांद्यावर सरसकट निर्यातबंदी लादल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांचा निवडणुकीत त्रास नको म्हणून मार्च अखेरीस ‘पाच लाख टन कांदा सरकार खरेदी करणार’ अशी घोषणा केली. प्रत्यक्षात ती हवेतच विरली. ३५ हजार टन खरेदी जरूर झाली; पण त्याचा फायदा उत्पादकांना झालाच नाही. साहजिकच पुन्हा एप्रिल अखेरीस एक लाख टन कांदा सहा देशांना निर्यातीस परवानगी देण्याचे जाहीर झाले. एव्हाना निवडणुकीस प्रारंभ झाला होता. ऐन प्रचार काळात शेतकऱ्यांसाठी हे चाटण होते, हे कळण्याइतके शेतकरी नक्कीच हुशार आहेत. त्यांनी या निर्णयातील फोलपणा लागलीच वेशीवर टांगला. यापूर्वीच्या काही राज्यांच्या निवडणुकीतही जीवनावश्यक वस्तूंच्या यादीतून कांदा वगळणे, निर्यातीस बंधन नसलेला हमी भावाचा नवा कायदा करणे असले उपाय केले गेले. या घोषणांची शाई वाळत नाही तोच देशांतर्गत बाजारपेठेतील दरवाढीवर नियंत्रणासाठी निर्यातबंदी करून चक्क इराणी कांदा आयात झाला.गेल्या वर्षी राज्य सरकारनेही कांद्याची महाबँक योजना जाहीर केली. कांद्यावरील प्रक्रिया उद्योगांचीही घोषणा झाली. पण पुढे काय... तर भले मोठे शून्य! अवघड प्रसंग तात्पुरता दूर करण्याची ही क्लृप्ती हा आता सर्वच सरकारांचा स्थायी भाव बनतो आहे. आताही निर्यातबंदी असताना, गुजरातच्या पांढऱ्या कांद्याला निर्यातीस परवानगी दिली. दोन वर्षांपूर्वीही आंध्र प्रदेशच्या कांद्याला हा विशेषाधिकार दिला गेला होता. हा दुजाभाव का केला जातो, याची ठोस कारणे दिली जात नाहीत. देशात कांदा उत्पादनात महाराष्ट्र अग्रस्थानी असल्याने अशा निर्णयांचे बरेवाईट परिणाम येथेच अधिक होतात. शहरी मतदारांचा रागलोभ सांभाळण्याला भाजपने दिलेले प्राधान्य या प्रश्नाच्या मुळाशी आहे. ती त्यांची राजकीय अपरिहार्यता आहे, पण देशाची कांदा गरज दीडशे लाख टन, तर उत्पादन सरासरी अडीचशे ते तीनशे लाख टन असताना सरकार असे का वागते, याचे कोडे उलगडत नाही. यंदाही पाणीटंचाईसह अन्य कारणांमुळे पस्तीस लाख टनाने उत्पादन कमी होण्याच्या अंदाजानेच अस्वस्थ झालेल्या भाजपने लगोलग वेगवेगळे निर्णय घेऊन शेतीतील यत्ता दाखवून दिली. पूर्वी महाराष्ट्रासह केवळ आठ राज्यांत कांद्याचे पीक घेतले जाई. कमी पाण्यात भरघोस उत्पादन देणाऱ्या या नगदी पिकाची नंतर २६ राज्यांना भुरळ पडून तीनशे लाख टनाचा टप्पा ओलांडला. उत्पादन वाढले की भाव पडणार, हा बाजाराचा साधा नियम. भाव कोसळून त्याचे फटके बसायला सुरुवात झाली. पुढे साधारण दर दोन वर्षांनी कधी अमाप पीक, तर कधी तुटवडा हे दुष्टचक्र सुरू झाले.

दुर्दैवाने, या स्थितीचा सर्वंकष अभ्यासच होत नाही. त्यामुळे देशांतर्गत भाव वाढले की निर्यातबंदी करायची, भाव पडले की नवनव्या घोषणांची द्वाही फिरवायची. या धरसोडपणामुळे कांदा उत्पादक दूर गेलाच; शिवाय कांद्याची परदेशी बाजारपेठही हातची गेली. आज पाकिस्तान, चीन व इराणने हा बाजार काबीज केला आहे. भारतीय कांद्याला, विशेषत: त्याच्या अंगभूत तिखटपणाला आखाती देशांतून विशेष मागणी असते. ही चव इतर देशातील कांदा भागवू शकत नाही. भारतीय कांद्याचा हा ‘यूएसपी’, त्याचे सोने करण्याची संधी आपण गमावतो. आताही निर्यातीला परवानगी देताना, तो परदेशात विकलाच जाणार नाही, अशी व्यवस्था करण्यात आली. ग्रामीण भागात एखाद्याची शुद्ध हरपली तर लागलीच त्याला कांदा हुंगायला देतात. निवडणूक काळात कांदा उत्पादक राज्यांमध्ये शुद्ध हरपण्याची वेळ येताच, भाजपने कांदा बाहेर काढला खरा; पण त्याचे नेमके उपयोग ठाऊक नसल्याने त्या संदर्भातील निर्णयाचे ‘बूमरँग’ होते की काय, अशी स्थिती आहे.

# मनाचा ब्रेक; उत्तम ब्रेक

‘सिलिकॉन व्हॅली’तील माझ्या एका मित्राने हौसेने ‘बीएमडब्ल्यू’ची सर्वोत्कृष्ट मोटारसायकल खरेदी केली. ‘हार्ले डेव्हिडसन’पेक्षाही भारी मानल्या जाणाऱ्या या मोटारसायकलची किंमत भपकेबाज मोटारींपेक्षा कमी नाही. क्षणार्धात वेग पकडण्याची गती आणि ब्रेक लावताक्षणी थांबण्याची क्षमता, हे अभियांत्रिकीचे आश्चर्य मानले जाते. पापणी लवताक्षणी ती हवेच्या वेगाने धावू लागते आणि मोटारींना ओलांडून पुढे जाते. चालकाचा वेष, गॉगल, हेल्मेट आणि बूटही सुरक्षेचा विचार करून तयार करण्यात आले आहेत. इतकेच नव्हे, तर खरेदी केल्यानंतर ती कशी चालवावी, यासाठी चालकांसाठी खास वर्गही घेण्यात आला. ब्रेक कसे लावायचे, ते लावताना तोल कसा सांभाळायचा, असे शिकवून होईपर्यंत वर्ग समाप्त झाला. या संपूर्ण वर्गात ‘ॲक्सिलेटर’ चा वापर कसा करायचा, हे मात्र एकदाही सांगण्यात आले नाही. अनेकदा मोटार किंवा दुचाकीचे योग्य वेळी ब्रेक न लावल्याने अपघात होतात. ‘ॲक्सिलेटर’ कसे वापरायचे हे शिकवावे लागत नाही; मात्र, ब्रेक लावण्याची कला शिकवावी लागते. कारण तोच मोठा धडा आहे.भगवान पतंजली आपल्या दुसऱ्या योगसूत्रात



म्हणतात, ‘मनाच्या वृत्तीचे, अंत:प्रेरणेचे नियंत्रण म्हणजेच योग होय. माशी जशी सगळीकडे फिरत राहते, त्याप्रमाणे आपले मन सदैव पळत राहते. योग म्हणजे या धावत्या मनाला थांबविण्याची कला आहे.’ त्यातही पतंजली मनाला कसे पळू द्यायचे, हे शिकवत नाहीत. उलटपक्षी मनाला ‘ब्रेक’ कसा लावायचा, यासाठीच हे संपूर्ण शात्र लिहिण्यात आले आहे. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितलेली गीता किंवा अन्य सर्व धर्मग्रंथांमध्ये इंद्रिये, मन, बुद्धी विकारांवर नियंत्रणाची कला शिकविण्यात आली आहे. मनाचे वेगवेगळ्या दिशांना पळणे सर्वांत सोपे आणि त्यावर नियंत्रण मिळविणे सर्वांत कठीण असते. सारे अध्यात्म आणि धर्मग्रंथ या धावत्या मनाला थांबविण्याची शिकवण देत आले आहेत. मनाचा स्वभाव वेगवेगळा असतो, म्हणून अभ्यास-सरावाचीही अनेक तंत्रे आहेत. ‘विज्ञान भैरवतंत्रा’मध्ये मनावर नियंत्रण मिळविण्याच्या ११२ ध्यान पद्धती सांगण्यात आल्या आहेत. दुचाकीला ब्रेक लावण्यास प्रशिक्षक शिकवितात, त्याप्रमाणेच आध्यात्मिक गुरूही शिष्याला मनाला ब्रेक लावण्याचे तंत्र शिकवितात.वेगवेगळ्या विचारांमध्ये मनाचे धावणे खूप सोपे असते, हे आपणही पाहतो. इच्छा नसतानाही मन धावतच राहते. तुम्ही प्रयत्न केले, तरी मन थांबण्याचे नाव घेत नाही. मनाचे हे शर्यतीप्रमाणे धावणे, ही कोणतीही कला नाही. पण या धावत्या मनावर नियंत्रण ही मात्र नक्कीच कला आहे. या मनाला कसे आवरायचे, यासाठीच अध्यात्मातील सारी मेहनत, अभ्यास आणि तंत्रांची योजना आहे. मनाला वेगाने धावू देतो, तो जगज्जेता ठरू शकतो; पण मनावर ताबा ठेवेल तो मनज्जेता होतो. जगज्जेते अनेक असतील, पण मनज्जेते बनू शकतील, असे विरळाच. जो मनाचा स्वामी झाला, तोच ‘मनुष्य’ होय.

# ‘एआय’चे राजकीय आव्हान

आगामी लोकसभेसाठी सर्वच राजकीय पक्षांचे नेते जनतेमध्ये आपले स्थान मजबूत करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहेत. मात्र, निवडणुकीपूर्वी कृत्रिम प्रज्ञेचा (एआय) गैरवापर ही राजकीय पक्ष आणि नेत्यांसाठी एक मोठी डोकेदुखी ठरत आहे. सोशल मीडिया हा अशा गैरप्रकारांचा मोठा वाहक आहे आणि ‘राजकीय टूल’ म्हणून एआयचा दुरुपयोग होताना दिसतो आहे. केवळ बदनामी करणे अथवा गैरसमज, भ्रम निर्माण करण्याची पायरी ओलांडून अनेकांची आयुष्ये उद्ध्वस्त करण्याकडे हे तंत्रज्ञान सहज जाऊ शकते. सध्या तरी त्यावर नियंत्रण ठेवणे सर्वांनाच अवघड जात असल्याचे दिसत आहे. जगभरात याची अनेक उदाहरणे आहेत.

गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये सोव्हिएत रशियामध्ये निवडणुका झाल्या. येथील प्रोग्रेसिव्ह स्लोव्हाकिया पक्षाचे नेते सिमेका हे त्या निवडणुकीत पराभूत झाले. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे निवडणुकीआधी दोन दिवस त्यांचा एक व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. निवडणूक जिंकल्यास बिअरची किंमत दुप्पट करू, असे सिमेका म्हणत असल्याचे या व्हिडीओमध्ये दिसत होते. वास्तविक, सिमेका यांनी अशी कोणतीही घोषणा केली नव्हती. ही सर्व करामत होती एआय तंत्रज्ञानाची. त्या बनावट व्हिडीओचे सत्य लोकांपर्यंत पोहोचण्याआधीच सिमेका आणि त्यांच्या पक्षाचे मोठे नुकसान झाले होते. ही घटना दूरच्या देशामधील असली तरी आपल्याकडे लोकसभा निवडणुकीतही अशाच पद्धतीचा खोटा प्रचार होण्याची भीती सर्वच राजकीय पक्षांना वाटत आहे.

भारतात राजकीय पक्ष आणि नेत्यांना असलेला डीपफेकचा धोका वाढत चालला आहे. याची अनेक प्रकरणे येथेही समोर आली आहेत. तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट, मोबाइल, ॲप्स यांनी प्रचार माध्यमांना गती दिली. निवडणुकीत तळपत्या उन्हापासून नेत्यांचे काही प्रमाणात संरक्षण केले. मात्र, आता याच तंत्रज्ञानाचे तोटेही समोर येऊ लागले आहेत. आत्तापर्यंत फोटो किंवा व्हिडीओ यांत फेरफार केल्याची प्रकरणे समोर येत होती; पण, एआयने या फसवणुकीला इतके बारकावे दिले आहेत की, खरे काय आणि खोटे काय हे ओळखणे अशक्य होऊन बसते.

तेलंगणमध्ये नोव्हेंबरमध्ये विधानसभा निवडणुका झाल्या. त्यावेळी बीआरएस पक्षाचे प्रमुख आणि राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांचाही एक डीपफेक व्हिडीओ तयार करण्यात आला होता. काँग्रेसला मतदान करा, असे सांगणारे राव त्यात दिसत होते. या डीपफेक व्हिडीओची बीआरएसने पोलिसात तक्रारही दाखल केली होती. राजस्थानमध्ये झालेल्या निवडणुकीतही मतदारांना आकर्षित करण्यासाठी माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्या आवाजाचा फेक ऑडिओ तयार करण्यात आला होता. व्हॉट्सपद्वारे मतदारांना नावाने कॉल करण्यासाठी एआयचा वापर करण्यात आला होता.

याशिवाय, नुकताच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा एक व्हिडीओ



व्हायरल झाला होता. या व्हिडीओमध्ये अमित शहा हे एससी, एसटी, ओबीसी यांच्यासाठी असणारे आरक्षण रद्द करण्याबाबत बोलत असल्याचे दाखवण्यात आले आहे. या व्हिडीओची चौकशी केली असता हा तो बनावट असल्याचे आढळून आले.

गृहमंत्री अमित शहा यांनी एससी, एसटी किंवा ओबीसी आरक्षण संपवण्याबाबत कोणतेही वक्तव्य केलेले नाही. संबंधित व्हिडीओ पूर्णपणे बनावट, खोटा आहे. यापूर्वीच्या भाषणांदरम्यान शहा म्हणाले होते की, सरकार स्थापन होताच मुस्लिम समाजाला दिलेले घटनाबाह्य आरक्षण काढून टाकण्यात येईल. हा फेक व्हिडीओ महाविकास आघाडीतील युवक काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षांच्या विविध जिल्ह्यांचे एक्स, इंस्टाग्राम, फेसबुक पेज तसेच विविध पक्ष, सेल आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या एक्स अकाउंटवरून प्रसारित करण्यात आला आहे.

डीपफेकने बनवलेला व्हिडीओ अर्थातच मूळचा नसतो. बनावट व्हिडीओ पाहून प्रश्न पडतो की, आवाजाची नक्कल इतकी अचूक कशी करता येते? तर, हा सगळा व्हॉइस ट्रेडिंगचा खेळ आहे. व्हॉइस क्लिनिंगच्या माध्यमातून अचूक जुळेल, अशा पद्धतीने आवाज तयार केला जातो. पण तरीही या व्हिडीओतला आवाज लक्षपूर्वक ऐकला तर तो कृत्रिम असल्याचे लक्षात येऊ शकते. परंतु मनात शंकाच जर आली नाही तर तो आवाज खरा असल्याचे गृहित धरले जाते आणि बहुतांशतः तसेच होताना दिसते.

वरील काही घटना लक्षात घेता असे दिसून येते की निवडणुकांमध्ये विरोधकांना हानी पोहोचवण्याच्या किंवा मतदारांना आपल्या बाजूने आकर्षित करण्याच्या हेतूने डीपफेकचा वापर झपाट्याने वाढताना दिसत आहे. अशावेळी जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीच्या - म्हणजेच भारताच्या निवडणुका डीपफेक्सपासून दूर ठेवता येणेही अशक्य दिसत आहे.

कोणत्याही निवडणुका मुद्दे, उमेदवाराची समाजामधील प्रतिमा यावरून लढविल्या जातात. म्हणजे तशी अपेक्षा तरी असते. मात्र, या दोन्ही गोष्टी नष्ट करण्याची क्षमता डीपफेकमध्ये आहे. भारतामध्ये ९० कोटींहून अधिक मतदार आहेत. यातील जवळपास ८० टक्के मतदारांकडे इंटरनेट सक्षम मोबाइल फोन आहेत. अशा वेळी डीपफेकची भीती अधिक प्रमाणात आहे. मतदानाला काही तास शिल्लक असताना असे डीपफेक ऑडिओ किंवा व्हिडीओ व्हायरल झाल्यास त्याचा फटका उमेदवारांना बसणार, हे निश्चित आहे. उमेदवार नंतर खुलासे देतीलही, पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असेल. एआय आणि डीपफेकच्या मदतीने लोकांची छायाचित्रे, व्हिडीओ आणि ऑडिओ अशा प्रकारे हाताळले जात आहेत की प्रत्येक जण हैराण आणि त्रस्त झाला आहे.

आता परिस्थिती अशी आहे की, केवळ सामान्य जनताच नाही तर अनेक सेलिब्रिटी आणि खुद्द देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील डीपफेकपासून वाचलेले नाहीत. आत्तापर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेही अनेक बनावट व्हिडीओ समोर आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही डीप फेक हा मोठा धोका असल्याचे सांगितले आहे. केंद्र सरकारने डीपफेकच्या मुद्द्यावर ‘शून्य सहनशीलता’ धोरण स्वीकारले आहे. अशा परिस्थितीत कोणी असे केले तर त्या व्यक्तीवर कडक कारवाई केली जाईल, असेही मोदींनी स्पष्ट केले आहे. केवळ भारतातच नाही तर जगात असे अनेक देश आहेत जे डीपफेकच्या विरोधात ठोस पावले उचलत आहेत. परंतु आता हे तंत्रज्ञान नियंत्रणात ठेवणे अवघड आहे. कोणत्याही तंत्रज्ञानाचा वापर करण्यामागे अखेर मानवी बुद्धीच असते आणि मानवाचा कल गैरवापराकडे अधिक असतो. त्यामुळेच, सध्याच्या काळात, तसेच येणाऱ्या भविष्यकाळात या आव्हानाचा सामना करणे, हे महत्त्वाचे काम आहे. आत्ता निवडणूक प्रचारामध्ये एआयच्या करामतींची काही प्रमाणात चुणूक दिसली आहे. तो एक इशाराच आहे. या इशाऱ्यापासून योग्य तो धडा घेऊन विविधांगी उपाययोजना करण्याची गरज आहे. तशी ती केली नाही तर सत्य काय आणि असत्य काय, हेच कळेनासे होईल. तसेच, असत्यामुळे समाजात अशांती निर्माण होण्याचाही धोका वाढेल.

# सागरी साहचर्य

सागरातल्या जलचरांच्या जीवनप्रणालीत मोठे वैविध्य आढळते. यापैकी काही प्रजातींमध्ये असलेले आपुलकीचे साहचर्य तर फार विस्मयकारक आहे! अशा प्रकारच्या सहजीवनात (सिम्बायोसिस) दोन भिन्न प्रजातींचे प्राणी एकाच जागेत भागिदारीत राहतात.

सागरातल्या जलचरांच्या जीवनप्रणालीत मोठे वैविध्य आढळते. यापैकी काही प्रजातींमध्ये असलेले आपुलकीचे साहचर्य तर फार विस्मयकारक आहे! अशा प्रकारच्या सहजीवनात (सिम्बायोसिस) दोन भिन्न प्रजातींचे प्राणी एकाच जागेत भागिदारीत राहतात. एक जण दुसऱ्याला अन्न मिळवायला मदत करतो; तर कधी दुसऱ्याचे वाहन बनून त्याची वाहतूक करतो. एखाद्या शिकारी प्राण्याचा हल्ला झाल्यास मित्राला सावध करून त्याचे संरक्षण करतो, लपायला मदत करतो.

प्राण्यांतील सहजीवनाचे उत्तम उदाहरण म्हणजे निळे चमकदार पट्टे, मजबूत दात असलेले रेसेस मासे. सफाई कामगाराप्रमाणे हा मासा मोठ्या माशांच्या दातांमध्ये आणि जबड्यांमध्ये अडकलेले परजीवी, मृत पेशी आणि त्या माशांच्या त्वचेवर चिकटलेले नको असलेले पदार्थ वेचून काढतो, त्यावर ताव मारतो. त्यामुळे या छोट्या माशांना ‘क्लीनर रेसेस’ असेच नाव पडले आहे! या क्लीनर माशांची प्रवाळ भित्तिकांजवळ वस्ती असते. भूक लागली की, ते नृत्य केल्याप्रमाणे ठराविक हालचाल करून दर्शवतात की, आता



सफाई केंद्र उघडले आहे, आता मोठ्या माशांनो या, रांग लावा! मग पोपटमासे आणि शार्क तिथे येऊन आपला जबडा वासून रांगेत थांबतात. पुढे क्लीनर मासा एकेकाच्या तोंडात शिरतो, सफाई करून त्यावर भोजन करतो! अशी ‘स्वच्छता केंद्रे’ पॅसिफिक आणि हिंदी महासागरात मोठ्या संख्येने आहेत.सागरी सहजीवनाचे आणखी एक उदाहरण म्हणजे रेमोरा मासे आणि बार्नाकल. हे दोघे जलचर हरित कासव आणि शार्क या दोघा मोठ्या प्राण्यांचा उपयोग चक्क वाहनाप्रमाणे करतात. रेमोरा आणि बार्नाकल या दोघांच्या कासव आणि शार्कच्या पाठीवर आपली पकड मजबूत करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. रेमोराचे पुढचे कल्ले कासव आणि शार्कची पाठ पकडून ठेवतात, तर बार्नाकल हे आपल्या लाळेतून एक चिकट द्रव शार्क आणि कासवाच्या पाठीवर सोडतो. त्यामुळे तो पाठीवर पक्का बसू शकतो. हे सर्व असते ते भक्ष्य शोधायला जाताना पोहोण्याचे श्रम वाचविण्यासाठी! पण हे सहजीवन एकतर्फी नसते. बदल्यामध्ये या मोठ्या वाहन प्राण्यांच्या पाठीवर चिकटलेल्या असंख्य त्रासदायक जिवाणूंना छोटे रेमोरा मासे खातात आणि स्वच्छ करतात, कासव आणि शार्कना ताजेतवाने करतात.

दैनिक लोकनेता



# मोदींची सभा पंकजाताईंच्या विजयावर शिक्कामार्तब ठरली





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अंबाजोगाई । प्रतिनिधी

इंडिया आघाडीचं सरकार आल्यावर मोदी सरकारच्या योजना कॅन्सल करतील, काँग्रेस आणि इंडिया आघाडीचं सरकार राम मंदिरही कॅन्सल करेल, असं वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ही सभा महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी ठरली आहे. गोपीनाथजी मुंडे आणि माझे नाते स्नेहाचे होते, म्हणूनच देशाने जेव्हा २०१४ मध्ये मला पहिल्यांदा सेवा करण्याची संधी दिली, त्यावेळी बीडमधून गोपीनाथ मुंडे विजयी झाल्यानंतर त्यांना दिल्लीमध्ये सोबत काम करण्यासाठी घेऊन गेलो होतो, मात्र नियतीने घात केला आणि मुंडेजी आपल्या सर्वापासून हिरावले गेले. मात्र आता दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी मी मबेटी पंकजा मुंडेंवर सोपवली आहे, त्यामुळे येत्या १३ तारखेला पंकजा मुंडे यांना आपण प्रचंड मताधिक्यांनी विजयी करावे असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.

भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आज कृषी महाविद्यालयाच्या विस्तीर्ण मैदानावर पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची जाहीर सभा झाली. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे, खासदार प्रीतमताई मुंडे जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे आदींसह जिल्ह्यातील सर्व आमदार, माजी आमदार, भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं, रासप, मनसेचे जिल्हाध्यक्ष उपस्थित होते.बीडच्या अंबाजोगाई येथील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेससह इंडिया आघाडीवर निशाणा साधला आहे. पंकजा मुंडे यांच्या प्रचारसभेत पंतप्रधानांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधला आहे.इंडिया आघाडीचं सरकार आल्यावर हे लोक मोदींची किसान सन्मान निधी योजना कॅन्सल करतील. गरीबांना मोफत रेशन देण्याची योजना कॅन्सल करतील, ५५ कोटी गरीबांना पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळण्याची योजना देखील काँग्रेस कॅन्सल करेल. इतकंच नाही, तर काँग्रेस आणि इंडिया आघाडीवाले राम मंदिरही कॅन्सल करेल. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मराठीत भाषणाला सुरुवात केली. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले, गोपीनाथ मुंडेंसोबत मनाचे संबंध होते, ते नेहमी मराठवाड्याच्या विकासाची चर्चा करायचे. २०१४ मध्ये मला तुम्ही साथ दिली, त्यावेळी गोपीनाथजी सारख्यांना निवडून दिल्लीला घेवून गेलो. पण दुर्दैवाने काही दिवसात मला माझ्या सहकारी ला गमवावे लागलं. सुषमा स्वराज, अरुण जेटली यांना गमावल्यानंतर माझे हात कट झाल्याची भावना निर्माण झाली. स्वाभाविक आहे मला आज गोपीनाथ जीची आठवण येत आहे, असं मोदींनी म्हटलं.मी आज तुमच्याकडे काही मागायला आलोय. मला तुमचे आशीर्वाद पाहिजे आहेत. माझी संपत्ती तुम्ही आहात. तुम्हीच माझे कुटुंब आहात. माझा देश माझे कुटुंब. एका काँग्रेस नेत्याने ज्याने काही दिवसा पूर्वी काँग्रेस सोडली. त्यांनी एक खळबळजनक विधान केले आहे. ज्यावेळी राम मंदिराचा निकाल आला, त्यावेळी शहजाद्याने म्हटलं होतं की, काँग्रेस सरकार आल्यावर राम मंदिरासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा निकाल बदलणार होते, असं वक्तव्य मोदींनी केलं आहे.

ही निवडणूक देशाचे आणि जिल्ह्याचं भलं करण्यासाठी विकासाच्या मुद्यावर आपल्याला लढवायची आहे. त्यामुळे मतदारांनो, निवडणूकीत जातीय सलोख्याची तस्करी होऊ देऊ नका. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या जिल्ह्यात मतदानरूपी आशीर्वाद घेण्यासाठी आले आहेत.मोदींकडे आग्रह करून ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या हातातील कोयता काढून घेण्यासाठी आगामी काळात मी प्रयत्न करणार आहे. मोदीजींची परवानगी समजून मुस्लिमांना वचन देते की, हा देश जेवढा तुमच्या आजोबा पणजोबांचा आहे तेवढाच तुमचा देखील राहिल. बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मला आपले मतरुपी आशीर्वाद द्या, तुमचे मत विकासासाठी सत्कारणी लावेल अशी ग्वाही भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले. कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अलोट जनसागराच्या साक्षीने विराट जाहीर सभा झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. पंकजाताई मुंडे म्हणाल्या, मी विकास केला आहे हे जनता मान्य करते. ही निवडणूक विकासासाठी आहे, राज्याला आणि जिल्ह्याला एकच सरकार हवे आहे.. देशासाठी काम करायची संधी आहे. पक्षाचा आदेश मानणारे आम्ही आहेत. विकासाबरोबर तरुणाचे भान हरपलं नाही पाहिजे यासाठी आपल्याला काम करायचे आहे. , जो वंचित, उपेक्षित आहे, ज्याचा कोणी वाली नाही त्याची सेवा करण्यासाठी माझ्या पित्याने मला राजकारणात आणलं असल्याचे त्या म्हणाल्या.

## नीलेश लंके तीन हजार व्होल्टेजचा करंट:त्यामुळे शॉक केवढा राहणार, नुसता जाळ होणार जाळ; बाळासाहेब थोरातांनी सुजय विखेंना डिवचलं

**अहमदनगर–**नीलेश लंके यांच्या प्रचाराच्या खूप सभा पाहिल्या आहेत. शरद पवार यांचे संपूर्ण आयुष्य तर सभांमध्ये गेलेले आहे. त्यानंतर सर्वात जास्त निवडणुका करण्यामध्ये माझा देखील नंबर लागतो. परंतु, नीलेश लंकेंच्या सभांमध्ये करंट असतो. साधा लाईट लागण्यामध्ये ३६० व्होल्टेजचा करंट असतो. पण तुमचा करंट ३ हजार व्होल्टेजचा आहे. ज्यावेळी तुमच्यामध्ये तो तीन हजार व्होल्टेजचा करंट संचारेल, तेव्हा शॉक केवढा राहणार? नुसता जाळ होणार जाळ, असे म्हणत काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी नाव न घेता सुजय विखे पाटलांवर निशाणा साधला.बाळासाहेब थोरात पुढे बोलताना म्हणाले की, नीलेश लंके यांच्या सभेला हजारोंच्या संख्यने लोक येत आहेत. आपण म्हणतो की, याची हवा, त्याची हवा. पण हवा राहिली नाही. आता हे वादळ आलं असून आपला मोठा विजय होणार आहे. या चक्रीवादळात कोण कोणाला फेकून देणार, पाहा ते कसं लांब उडून जाऊन पडेल, असा टोला बाळासाहेब थोरात यांनी महायुतीचे उमेदवार डॉ. सुडय विखे यांना लगावला.

## ज्ञानेश्वर...

लोकनेता न्युज नेटवर्क

मातृतीर्थ मध्ये
निष्पक्ष दैनिक
बातम्या अनेक
बहुमोल...

समस्यांना वाचा
फुटते अचूक
करतो जो चूक
शिक्षा त्यासी....

काकदृष्टी सम
चौफेर नजर
घेई समाचार
कंटकांचा...

आहे ज्ञानेश्वर
एक संपादक
घायाळ कित्येक
लेखणीने...

वाढदिवशी या
अभीष्टचिंतन
गाठेल गगन
लोकनेता....

**प्रा. मधुकर जाधव**
**देऊळगाव राजा**
**९४२१३२७६८९**

# थोर समाज सुधारक लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज

लोकनेता न्यूज नेटवर्क

शाहू भोसले हे छत्रपती शाहू महाराज, राजर्षी शाहू महाराज, कोल्हापूरचे शाहू व चौथे शाहू नावाने प्रसिद्ध, हे कोल्हापूर संस्थानाचे १८९४–१९२२ दरम्यान छत्रपती व मराठी समाज सुधारक होते. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या एकूणच सामाजिक उन्नतीसाठी या काळामध्ये शाहू राजांनी अथक प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली. सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी दलित (अस्पृश्य) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत, त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले, व 'शाहू' हे नाव ठेवले. १८८९ ते १८९३ या चार वर्षांच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला. शिक्षण चालू असतानाच १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू विवाहबद्ध झाले. या वेळी त्यांचे वय १७ वर्षांचे होते आणि लक्ष्मीबाई वय १२ वर्षांहून कमी होते. एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. मुंबई येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला.

१९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी १९१६ ला निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेले वेदोक्त प्रकरण शाहू महाराजांच्याच काळात झाले. त्यांचे शिक्षण ब्रिटिश अधिकारी फ्रेजर यांच्या हाता खाली झाले. पुढील शिक्षण राजकोटच्या राजकुमार कॉलेज मध्ये व धारवाड येथे झाले. अभ्यास व् शैक्षणिक सहलीद्वारे मिळालेले व्यवहारज्ञान यामुळे शाहूराजे यांचे व्यक्तिमत्व विकसित झाले होते. १८९६ चा दुष्काळ व नंतर आलेली प्लेगची साथ या काळात त्यांची कसोटी लागली आणि त्याला ते पूर्णपणे उतरले. दुष्काळी कामे, तगाईवाटप, स्वस्त धान्यदुकाने, निराधार आश्रमाची स्थापना हे कार्य पाहता 'असा राजा होणे नाही' असेच प्रजेला वाटते. शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल, शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषिविकासाकडे लक्ष पुरवले. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी, तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठीही सहकार्य केले होते. त्यांनी चित्रकार आबालाल रहिमान यांच्यासारख्या कलावंतांना राजाश्रय देऊन प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. स्वातंत्र्यापूर्वी कैक वर्षे आधी समता, बंधुता, धर्म निरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात 'महाराजांचे महाराज' असा गौरव होतो. रयत प्रजा व उपेक्षित समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य शाहूंनी केले. आपल्या संपूर्ण जीवन कार्यामध्ये त्यांनी समाजातील बहुजन समाजाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर केला म्हणूनच ते लोककल्याणकारी राज्यकर्ते ठरले.

महाराजांनी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी तळमळ होती. म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. तसेच ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळा काढल्या. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रू. दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद केली. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले, दुकाने हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले, तसेच आर्थिक मदत देखील देऊ केली. अस्पृश्यांना शिवण यंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले. राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली. गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्य वस्तीत चहाचे दुकान काढून दिले. अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार पैलवानांना पैलवान चांभार यांना सरदार अभंग यांना पंडित अशा पदव्या दिल्या, अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा व कार्याचा वारसा समर्थपणे चालवणारा राजा म्हणून आपली ओळख निर्माण केली. सामाजिक बंधुभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उध्दार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रिडा व आरोग्य इत्यादी महत्वपूर्ण क्षेत्रामध्ये अद्वितीय स्वरूपाचे कार्य केले. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव



जागांची तरतूद केली पाहिजे. हा व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली व तिची त्वरित अंमलबजावणी करुन संबंधित अधिकाऱ्याकडून अहवाल मागविले.

शाहूंच्या या निर्णयाला तेंव्हा अनेक उच्चवर्णीय पुढाऱ्यांनी विरोध केला. त्या काळात अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीच्या लोकांसाठी नोकरीमध्ये राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या. शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढला. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली. बहुजन समाजाला राजकीय निर्णय प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. त्याकाळी धर्माच्या नावाखाली देवांना मुले–मुली वाहण्याची विचित्र पद्धत भारतात चालू होती. परंतु राजांनी आपल्या संस्थानात जोगत्या–मुरळी प्रतिबंधक कायदा करुन ही पद्धत बंद पाडली. जातिभेदाचे प्रस्थ नष्ट व्हावे म्हणून आपल्या संस्थानात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशर मान्यता दिली. तसा कायदा पारित केला आणि याची प्रत्यक्ष अंमल बजावणी करताना आपल्या चूलत बहीणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. एवढेच नव्हे तर संस्थानात जवळजवळ १०० मराठाधनगर विवाह घडवून आणले. अशा अनेक कार्यांच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांना सन्मानाची वागणूक व दर्जा मिळवून दिला.

तत्कालीन परिस्थितीमध्ये जातिव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला, त्यामुळे त्यांचे जीवन नैराश्यमय झाले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी चोऱ्या, दरोड्यांचा मार्ग अवलंबला. त्यामुळे ब्रिटिश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे. शाहू राजांना या लोकांविषयी कणव होती. कारण ते खऱ्या अर्थाने वंचितांचे राजे होते. त्यामुळे शाहूंनी हजेरी पद्धत बंद केली. या जाती जमातींच्या लोकांना एकत्रित करून गुन्हेगारी पासून त्यांना परावृत्त केले. त्यांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. वणवण भटकणाऱ्या लोकांच्या राहण्याची सोय झाली. पोटापाण्याची सोय झाली. त्यामुळे गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेल्या लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले. गुन्हेगारांना शासन करणारा सत्ताधीश सर्वत्र पहायला मिळेल. मात्र त्यांना प्रेमाने, मायेने आपलेसे करुन समाजात सामाजिक दर्जा देणारा व त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणारा राजा विरळाच. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रेरित झाली. बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना त्यांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली. त्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले. कोल्हापूर संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याचे ही महत्त्वाची जबाबदारी राजर्षी शाहू महाराजांनी पार पडली. त्यांच्या नेतृत्वाखालीच संपूर्ण कोल्हापूर संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळ उभी राहिली आणि ती नेटाने पुढे नेण्याची कामगिरी देखील पार पाडली गेली. पुढे या चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याची महत्त्वाची जबाबदारी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पार पाडली यासाठी त्यांनी शिक्षणातून बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास हे सूत्र अंगिकारले. दलित पीडित उपेक्षित समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला यामागे खरी प्रेरणा ही राजर्षी शाहू, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची होती.

बाबासाहेब आंबेडकरांना माणगावच्या परिषदेमध्ये दलितांचा नेता व भारतीय अग्रणी नेता म्हणून घोषित केले. यापुढील काळामध्ये बाबासाहेबांनी दलित उपेक्षित समाजाचे नेतृत्व करावं असं आवाहनही महाराजांनी केलं. शाहू यांनी सर्व उपेक्षित समाजातील व अस्पृश्य वर्गातील लोकांना आपल्या संस्थानामध्ये आरक्षणाद्वारे नोकऱ्या देण्याचा प्रयत्न केला, यादृष्टीने संपूर्ण भारतामध्ये आरक्षणाचे जनक म्हणून त्यांचा गौरव केला जातो. सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन शाहूराजांनी सामाजिक समतेसाठी प्रयत्न केले. शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांतील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्कार्य केले. महाराजानी कोल्हापूर, बेळगाव या भागातील स्वातंत्र्यवीराना वेळोवेळी आर्थिक व इतर मदत केली. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध चांगले होते. डॉ. बाबासाहेबांनी 'मूकनायक' हे साप्ताहिक ३१ जानेवारी १९२० ला प्रथम प्रकाशित केले. परंतु आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद पडले. परंतु हे राजर्षी शाहू महाराजांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तत्काळ आर्थिक मदत केली.

### जातिभेदा विरुद्ध लढा

त्यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दुष्ट पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणार्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा, बहुजन विद्यार्थ्यांसाठी वैदिक पाठशाळा, संस्कृत भाषेच्या विकासासाठी संस्कृत शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. शाहू महाराजानी समतेवर आधारीत राज्य निर्माण केले. त्यामुळे जातीयवादी समाजकंटक लोकानी महाराजाना ठार मारण्याचे प्रयत्न केले. एकदा मारेकरी पाठवून आणि एकदा बॉंब फेक करून महाराजांना दगा करायचा प्रयत्न केला गेला. पण जनतेचे प्रेम आणि दुवा यांच्या पुण्याईने महाराज सुखरूप राहिले. महाराजाना बदनाम करायचेही अनेक प्रयत्न झाले. पण शत्रूंचे सारे प्रयत्न विफल ठरले.

### शैक्षणिक कार्य

* व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस (१९०१)
* दिगंबर जैन बोर्डिंग (१९०१)
* वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह (१९०६)
* मुस्लीम बोर्डिंग (१९०६)
* मिस क्लार्क होस्टेल (१९०८)
* दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग (१९०८)
* श्री नामदेव बोर्डिंग (१९०८)
* पांचाळ ब्राह्मण वसतिगृह (१९१२)
* श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह (१९१५)
* इंडियन ख्रिश्चन होस्टेल (१९१५)
* कायस्थ प्रभू विद्यार्थी वसतिगृह (१९१५)
* आर्यसमाज गुरूकुल (१९१८)

### इतर कार्ये

शाहू छत्रपती स्पिनिंग न्ड विव्हिंग मिल'ची स्थापना, शाहुपुरी व्यापारपेठेची स्थापना, गुळाच्या बाजारपेठेची निर्मिती, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांची स्थापना, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे असे उपक्रम त्यांनी आपल्या संस्थानात राबविले. शेती, उद्योग, सहकार या क्षेत्रांत राजर्षींनी नवनवे प्रयोग केले. शेतीच्या आधुनिकीकरणासाठी त्यांनी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके व तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यासाठी त्यांनी 'किंग एडवर्ड ग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' स्थापन केली. राजांनी त्याकाळी पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन भविष्यात रयतेला दुष्काळाला सामोरे जावे लागणार नाही यासाठी राधानगरी नावाचे धरण बांधले.

### कलेला आश्रय

राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांतील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वाचे कार्य केले.

### सन्मान

शाहू महाराजांचा २६ जून हा जन्मदिवस महाराष्ट्रात 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून पाळला जातो. त्यादिवशी सार्वजनिक कार्यक्रम होतात. कोल्हापूरच्या राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टतर्फे 'राजर्षी पुरस्कार' रोख एक लाख रुपये आणि सन्मानचिन्ह या स्वरुपात दिला जातो.

**अनिल महल्ले**
**उपमाहिती कार्यालय उमरखेड**

# जिल्ह्याचे नाव देशपातळीवर पोहोचवण्यासाठी पंकजाताई यांना प्रचंड मतांनी विजयी करा-माजी आ. भिमराव धोंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे बीड जिल्ह्याचे विकास कामांचे अपुरे राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि बीड जिल्ह्याचे नाव देश पातळीवर पोहोचविण्यासाठी भारतीय जनता पार्टीचा राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांचा त्यांना आजचे मताधिक्य देऊन प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी बीड जिल्ह्यातील जनतेला केले आहे आष्टी येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वीच आम्ही भारतीय जनता पार्टीच्या उमेदवाराचा प्रचार सुरू केला आहे आष्टी विधानसभा मतदारसंघाचा विचार करता भारतीय जनता पार्टीचे विधान परिषद सदस्य आमदार सुरेश धस राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विधानसभा सदस्य आमदार बाळासाहेब आजबे असे आम्ही तिघेही एकत्र आहोत त्यामुळे आमच्यावर मोठी जबाबदारी आहे मागील



निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार महायुतीमध्ये नसताना देखील १ लाख ७१ हजार मतांनी डॉ.प्रीतम मुंडे विजयी झाल्या होत्या यावेळी आता बीड जिल्ह्यामध्ये भारतीय जनता पार्टी, शिवसेना यांच्याबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दिग्गज नेते महायुतीमध्ये आल्यामुळे मागील निवडणुकीतील मताधिक्यापेक्षा यावेळी आणखी कितीमते जास्तीचे वाढविता येतील यासाठी प्रयत्न आम्ही सगळे करत आहोत. गेवराई तालुक्यातून अमरसिंह पंडित,परळी तालुक्यातून पालकमंत्री धनंजय मुंडे, माजलगावातून आ.प्रकाश सोळंके यांच्यासह जिल्ह्यातील राष्ट्रवादी पार्टी हे एकत्र आल्याने त्यांची ताकद किती आहे ? हे देखील पाहणे महत्त्वाचे आहे. मराठा समाजाला महायुती शासनातील मंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित दादा पवार यांच्या मंत्रिमंडळाने विधानसभेमध्ये ठराव पारित करून १०% आरक्षण सरकारने दिले असल्याने सरकार आरक्षणाच्या बाबतीत सकारात्मक असल्याचे यावरून दिसून येत आहे. खतांच्या वाढत्या किमती बाबत बोलताना ते म्हणाले की युक्रेन रशिया युद्धा मुळे देखील कच्च्या मालाच्या किमती कमी-जास्त होत असल्यामुळे खताच्या किमती वाढत आहेत असे सांगत आष्टी तालुक्याला पाणी उपलब्ध करून देण्याच्या गोष्टी गेले वीस वर्ष सत्तेत राहिले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आता करत आहेत याबद्दल त्यांनी जयंत पाटील यांचे नाव न घेता उल्लेख केला..

### कौटुंबिक दु:ख बाजूला सारून प्रचार दौऱ्यात सहभागी


नुकतेच माजी आमदार भीमराव धोंडे यांचे बंधू स्व.बापूसाहेब धोंडे यांचे दु:खद निधन झालेले असताना सुध्दा आपले कौटुंबिक दु:ख बाजूला सारून प्रचार सभेत सहभागी होऊन पंकजा मुंडे यांच्या विजयासाठी पायला भिंगरी बांधून प्रचार करताना दिसत आहेत.

मागील लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार डॉ.प्रीतम मुंडे यांना १लाख ७१हजार मतांचे मताधिक्य मिळाले होते आता या निवडणुकीमध्ये आष्टी मतदारसंघात. ७० ते ७५ हजाराची लीड मिळेल. असा आपला राजकीय अंदाज आहे. त्यासाठी भारतीय जनता पार्टी आणि मित्र पक्षाच्या सर्व पदाधिकारी आणि गाव पातळीवरील कार्यकर्त्यांनी परिश्रम घेण्याची आवश्यकता आहे असेही त्यांनी शेवटी सांगितले.

---

**लोकनेता न्युज नेटवर्क**

नातं हे प्रेमाचं , नातं हे सखीचं, वेलात गुंफलेलं,..अस्खलित सुख आणि दु:खाचं: पण तितकच हृदयस्पर्शी पती - पत्नी नात्याने बहरलेलं, म्हणतात ना फुलोरा वेलिंचा सुगंध देत आहे..,तोवर परिभ्रमिक उडणाऱ्या पाकळ्या मनमोहक आनंद घेत आहे,.,त्याच प्रमाणे, जीवन जगत असतांना येणाऱ्या संकटान्ना यथोचित मार्गशिस्त करून,प्रत्येक क्षणी संस्काररुपी साथ देणारी मोलाची असते, मग,सुरवातीला आई वडील की,ज्यांचा आपण मोल ही करू शकत नाही,ते सदैव आपल्या सोबत असतातच, नंतरचं जीवन म्हणजे वैवाहिक,.. नात्यातली हीच खरी कसोटी असते, कोणताही सहवास किंबहुना ओळख पाळख नसतानाही..



दोघांच्या जीवनातील समरसपणाची हीच खरी कमिटमेंट असते, आणि हीच कमिटमेंट.. आज पर्यंतच नव्हे तर शेवटपर्यंत अगदी दीर्घ श्वासापर्यंत असेल हीच शाश्वती तुझ्या सहवासाने, परिस्पर्शाने किंबहुना तुझ्या कार्यतत्पर, निरागस मनाच्या सहृदयी प्रेमाने सदैव तेवत आहे.

---

# मौजे बोरगांव (बु) येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**

तालुक्यातील मौजे बोरगांव (बु) येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन समस्त गावकरी मंडळ यांच्या सहकार्याने उद्या गेली ३१ वर्षापासुनची परंपरा चालवत दि.०९ /०५/२०२४ पासुन सुरूवात होत आहे तरी पंचकृषीतील भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा आवश्य लाभ घ्यावा.कार्यक्रमाची रूपरेषा खालीलप्रमाणे पहाटे ०४ ते ०६ काकडा भजन ,०६ :३० ते०७:०० विष्णु सहस्त्र नाम ,०७:०० ते ११:०० ज्ञानेश्वरी पारायण ,११:०० ते ०१:०० गाथा भजन ,दुपारी ०१:०० ते ०३:०० भोजन व विश्रांती ,०४ :००ते ०६:०० रामविजय ग्रंथ अध्याय ,०६ ते ०७ हरिपाठ ,सायं ०७ :०० ते ०९ :०० भोजन ,रात्री ०९:०० ते ११:०० किर्तन व नंतर हरिजागर दि.०९ /०५/२०२४ रोजी किर्तन सेवा ह.भ.प.महादेव महाराज ढाकणे,१०/०५/२०२४ रोजी ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज काकडे,११/०५/ २०२४ रोजी ह.भ.प.महंत भगवान महाराज वरपगांव ,१२/०५/२९२४ रोजी ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर,१३/०५/२०२४ रोजी ज्ञानोबा माउली महाराज ,१४/०५/२०२४ रोजी ह.भ.प.शाम महाराज नेरकर,१५/०५/ २०२४ रोजी ह.भ.प.महंत भगवान महाराज मस्के व दि. १६/०५/२०२४ रोजी ह.भ.प.लक्ष्मण महाराज कोकाटे कन्हेरी संस्थान बारामती यांचे सकाळी ०९:०० ते ११:०० काल्याचे कीर्तन व समस्त गावकरी मंडळ यांच्या मार्फत काल्याचा महाप्रसाद होईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

---

# पिंपळदरी येथे रक्तदान शिबिर संपन्न

## सरपंच बंडू ढाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित शिबिरात स्वत: सरपंच यांच्यासह ३८ तरुणांनी केले रक्तदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुळावा । सय्यद रहीम रजा**

रक्तदान हेच जीवनदान, रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' असे समजले जाते. राज्यातील विविध रुग्णालयांमध्ये आज मोठ्या प्रमाणात रक्तपेढींमधील साठा कमी पडू लागला आहे.जगातील शास्त्रज्ञ अनेक नवनवीन प्रयोग यशस्वी करत आहेत, नवनवीन गोष्टींचा शोध घेत आहेत, पण रक्त तयार करण्याचे तंत्रज्ञान विकसित करू शकले नाही,आणि कदाचित ते होऊ सुद्धा शकणार नाही, हीच गरज लक्षात घेऊन आदर्श गाव पिंपळदरी गावचे सरपंच बंडू ढाकरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त पिंपळदरी येथे दि,६-५ सोमवार रोजी रक्तदान शिबीर आयोजित केले होते, या शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस तातूभाऊ देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

तर प्रमुख उपस्थिती मंचक चव्हाण उपसभापती



कृषी उत्पन्न बाजार समिती उमरखेड, आंबदास धुळे सामाजिक कार्यकर्ते, चरण डोंगरे माजी सरपंच धनज,विजय हनवते संचालक ख, वि,स,उमरखेड, मनीषा कऱ्हाळे मा,पंचायत समिती सदस्य ,सुरेश तांबारे,मारोती कऱ्हाळे, शंकर मासोळकर शाळा समिती अध्यक्ष, सुभाष ढाले तं,मु,अध्यक्ष, मारोती नाईक,उत्तम माहुरे,उत्तम रिठे,उपस्थित होते, आज पिंपळदरी सारख्या खेड्यात रक्तदान शिबिर आयोजित करून येथील सरपंच व रक्तदान करणारे तरुण यांच्याकडून आदर्श घेण्यासारखी बाब आहे, रक्तदानाच महत्त्व ग्रामीण भागातील तरुणांनी ओळखून समाजाप्रती आपली बांधीलकी जपली हे कौतुकास्पद असल्याचे मत तातूभाऊ देशमुख यांनी व्यक्त केले, या रक्तदान शिबारात स्वतः सरपंच बंडू ढाकरे,शाळा समिती अध्यक्ष शंकर मासोळकर,उत्तम रिठे,विनोद तांबारे, माधव तांबारे, दिलीप रिठे, केशव तडसे लक्ष्मण बंदुके,तानाजी भिसे, बाळू लक्ष्मण बुरकुले,यांच्यासह गावातील ३८ तरुणांनी रक्तदान केले.

---

# मा.मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे बावडा येथे लोकसभा निवडणुकीसाठी सहकुटुंब मतदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

भाजप नेते, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी देशाच्या १८ व्या लोकसभेसाठी बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये बावडा (ता. इंदापूर) येथे मंगळवारी (दि.७) सकाळी सहकुटुंब मतदान केले. यावेळी इंदापूर तालुका जिजाऊ बचत गट असोसिएशनच्या अध्यक्षा भाग्यश्री पाटील, पुणे जिल्हा भाजप युवा मोर्चाच्या अध्यक्षा अंकिता पाटील ठाकरे, इंदापूर तालुका भाजप युवा मोर्चा कोअर कमिटीचे अध्यक्ष राजवर्धन पाटील या कुटुंबातील अन्य सदस्यांनीही यावेळी मतदानाचा हक्क बजावला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी तिऱ्यांदा पंतप्रधान होणार आहेत हे निश्चित आहे. तर देशात भाजप ४०० प्लस चे उद्दिष्ट पूर्ण करेल अशी परिस्थिती आहे. तसेच बारामती लोकसभा मतदारसंघातून महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांचा विजय



**माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी बावडा (ता. इंदापूर) येथे बारामती लोकसभा निवडणुकीसाठी सहकुटुंब मतदान केले.**

निश्चित आहे, असे मतदानानंतर पत्रकारांशी बोलताना हर्षवर्धन पाटील यांनी नमूद केले. बावडा येथील मतदानानंतर हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूर तालुक्यातील अनेक मतदान केंद्रांना भेटी दिल्या. मतदारांनी आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावावा, तर मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी कार्यकर्त्यांनी विषेश परिश्रम घेतल्याचे याप्रसंगी हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

---

# निर्यातबंदी करून शेतकऱ्यांचे वाटोळं करण्याचे पाप सरकारने केले-जयंत पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

दुष्काळजन्य परिस्थिती, वाढती महागाई, बेरोजगारीचे वाढते प्रमाण,वाढलेल्या खतांच्या किमती,निर्यात बंदी यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थितीची केंद्र सरकारने कोंडी केली असून त्यामुळे शेतकरी हवालदिल होऊन आत्महत्या करीत आहेत म्हणून हे शेतकऱ्यांचे सरकार नसून धनदांडग्याचे सरकार आहे त्यामुळे येणाऱ्या १३ तारखेला शेतकरी पुत्राला मतदान करून दिल्लीच्या तक्त्याकडे पाठवा असे आवाहन जयंत पाटील यांनी केले आहे.

पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले की, बीड जिल्हा हा दुष्काळी भाग असून दुष्काळचा कलंक पुसण्यासाठी माझ्या काळात आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलाव,शिरूर तालुक्यात सिंदफणा प्रकल्पाची उंची वाढवण्यासाठी प्रयत्न केले. बीड जिल्ह्यातील जनतेला रेल्वेचे स्वप्न दाखवले ते ही पूर्ण करता आले नाही, जनता यावेळी जिल्हयात चमत्कार घडविणार आहे. सरकारने जिएसटी च्या माध्यमातून सर्व सामान्य जनतेच्या पैशांची लूट केली.शेतकऱ्यांच्या शेतमालाला निर्यात बंदी करून केंद्र सरकारने शेतकऱ्यांना नुकसानीत



टाकण्याचे पाप केले असे म्हणत जयंत पाटील म्हणाले की, सत्तेत आल्यावर आम्ही आरक्षण देऊ.पंतप्रधान यांना निवडणुकीसाठी जिल्हयात यावे लागते म्हणजे जनतेने निवडणुक हातात घेतल्याने बजरंग सोनवणे यांचा विजय निश्चित आहे असे ही शेवटी जयंत पाटील म्हणाले.

बीडची निवडणुक जनतेने हाती घेतली असून येथील जनता ही स्वाभिमानी आहे.परंतु काही राजकीय व्यक्ती स्वतःच्या स्वार्थासाठी आपला स्वाभिमान गहाण टाकत आहे. मोदी सरकारने सर्व सामान्य जनतेला महागाईच्या खाईत ढकलून दिले आहे. बीड जिल्ह्यात प्रचारासाठी मुंबई दिल्ली येथून हेलिकॉप्टर, विमानाने कितीही नेते येऊद्या काही फरक पडणार नाही. परंतु ४ जूनला बजरंग सोनवणे यांना विजयी करून त्यांना दिल्लीला पाठवा असे म्हणत मतासाठी देशात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातोय.मोदी सरकार रोजगार, बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्नावर न बोलता जातीपातीचे राजकारण करत असल्याचा आरोप खासदार अमोल कोल्हे यांनी केला. ते सोमवारी आष्टी येथे महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ

### पालक मंत्र्याला आपल्या बहिणीचा पराभव पाहण्याची घाई झाली आहे- सोनवणे

दहा वर्षात आपल्या खासदाराने किती निधी खर्च केला एवढेच जनतेला सांगावे. बीड जिल्ह्यातील जनतेला जातीचे राजकारण काय आहे हे माहीत नव्हतं परंतु जातीपातीचे राजकारण कोण करत आहे हे सर्वांना माहीत आहे.

आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाला आमदार संदीप क्षीरसागर,माजी आमदार सय्यद सलीम,माजी आमदार साहेबराव दरेकर,माजी आमदार सुनील धांडे,उषा दराडे, परमेश्वर सातपुते,महेबुब शेख, सुशीलाताई मोराळे,दीपक केदार, कॉम्रेड महादेव नागरगोजे, जीवन गोरे,विष्णुपंत घोलप आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राम खाडे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब मिसाळ व डॉक्टर नदीम शेख यांनी तर आभार गणीभाई तांबोळी यांनी मानले. या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व खासदार अमोल कोल्हे यांच्या उपस्थितीत असंख्य कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला. रखरखत्या उन्हात कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904